BHANDARA

(31/1)

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

जा. क्र. विप्रो-भंडारा (सु)/टीपीव्ही-२/३०८५

मध्यवर्ती कार्यालय,
पुणे : १. दि.२९ मे ९२

प्रति,

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
नागपूर.

विषय :- विकास योजना भंडारा (सुधारित).
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१ (१) अन्वये अंतिम मंजूरी देण्यासंबंधीची अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.

भंडारा शहराच्या (सुधारित) विकास योजनेला, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये अंतिम मंजूरी देण्यासंबंधीच्या अधिसूचनेची मराठी व इंग्रजी प्रत सोबत जोडीली आहे. कृपया ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभागीय पुरवणीमध्ये तातडीने प्रसिद्ध करावी. ही अधिसूचना शासन राजपत्रात दि. ३१ मे ९२ पूर्वी प्रसिद्ध होणे कायद्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदर अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित राजपत्राच्या प्रत्येकी ५ प्रती खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांना पाठवाव्यात.

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
३) नगर रचनाकार, भंडारा शाखा, भंडारा.
४) मुख्याधिकारी, भंडारा नगरपरिषद, भंडारा, जिल्हा-भंडारा.

Inward No. 996
Date 23/6/92

(गुणवंत मदाने)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत अधिसूचनेच्या प्रतीसह :-
१) मा. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
३) जिल्हाधिकारी, भंडारा.
४) उपसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.
५) नगर रचनाकार, भंडारा शाखा, भंडारा.
६) मुख्याधिकारी, भंडारा नगरपरिषद, भंडारा, जिल्हा-भंडारा.

भंडारा

नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मध्यवर्ती कार्यालय, पुणे : ४११ ००१.

अधिसूचना

क्रमांक : विप्रो-भंडारा(सु)/टीपीव्ही-२/३०८५

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

ज्याअर्थी, भंडारा नगरपरिषदेने (यापुढे "उक्त नगरपरिषद" असे उल्लेखिलेली) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) चे कलम ३८ आणि २३(१) नुसार दिनांक १६ सप्टेंबर, १९८१ रोजीच्या ठरावान्वये भंडारा नगरपरिषदेच्या संपूर्ण हद्दीकरिता सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त विकास योजना" असे उल्लेखिलेली) तयार करण्याचा इरादा जाहीर करून त्याचे प्रसिद्धीकरण महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग-१ नागपूर विभागीय पुरवणी, दिनांक १० डिसेंबर, १९८१ मध्ये पृष्ठ क्र. ३१ वर केले आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने तिच्या संपूर्ण हद्दीतील जमिनीचे सर्वेक्षण केल्यानंतर उक्त विकास योजनेचा प्रारूप आराखडा तयार करून उक्त अधिनियमाचे कलम २६(१) नुसार दिनांक २६ मार्च, १९८५ रोजी प्रसिद्ध करून त्यासंबंधीची सूचना दिनांक ४ एप्रिल, १९८५ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात, भाग-१अ, नागपूर विभागीय पुरवणीमध्ये पृष्ठ क्र. ५६ वर प्रसिद्ध केली,

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने उक्त प्रारूप विकास योजनेसंबंधी विहित मुदतीत आलेल्या सूचना/हरकतींचा विचार करून उक्त अधिनियमाच्या कलम २८ नुसार उक्त प्रारूप विकास योजनेत काही फेरबदल करण्याचे ठरवून असा फेरबदल केलेला प्रारूप सुधारित विकास योजना संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाच्या कलम ३०(१) अन्वये मंजूरी मिळण्याकरिता दिनांक २३ मार्च, १९८८ रोजी सादर केली,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१ उपकलम १ मधील तरतुदींनुसार उक्त विकास योजना नियोजन प्राधिकरणाकडून प्राप्त झाल्यापासून एक वर्षाच्या कालावधीत किंवा शासन ठरविल त्या मुदतीत शासनाकडून मंजूर करावयाची आहे,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने नगर विकास विभाग निर्णय क्रमांक : टीपीव्ही-१०८८/३५२१/सीआर-१०२/९/८७/नवि-१३, दिनांक ५ जानेवारी, १९८७ अन्वये "ब" आणि "क" वर्ग नगरपरिषदांच्या सर्व विकास योजनांना मंजूरी देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३१ नुसार मंजूरी देण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत,

....२...

-२-

आणि ज्याअर्थी, भंडारा नगरपरिषद ही "ब" वर्ग नगरपरिषद आहे,

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अधिसूचना क्रमांक : विप्रो-भंडारा(सु)/टीपीव्ही-२/२११३, दिनांक ९ एप्रिल, १९९२ द्वारे उक्त विकास योजनेला अंतिम मंजूरी देण्याचा कालावधी दिनांक ३१ ऑगस्ट, १९९२ पर्यंत वाढवून दिला आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेतील प्रस्तावांची छाननी करून योजनेला जोडलेल्या परिशिष्ट फेरबदलांच्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे काही विशिष्ट फेरबदलासह उक्त विकास योजनेला मंजूरी देण्याचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रस्तावित आहे,

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) नुसार प्रदत्त असलेल्या शासनाच्या अधिकारांचा वापर करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे या अधिसूचनेद्वारे :-

(अ) उक्त विकास योजनेला या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या फेरबदलांसह मंजूरी देत आहेत,

(ब) दिनांक १ सप्टेंबर, १९९२ या दिनांकापासून अंतिम विकास योजना भंडारा (सुधारित) अंमलात येईल असे निश्चित करीत आहेत.

टीप :- वरील प्रमाणे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मंजूर केलेली विकास योजना भंडारा नगरपरिषद कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्यांच्या कालावधीसाठी नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात येईल.

फेरबदलांची अनुसूची.

१) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील आरक्षण क्र. ३ व ४ खालील परिशिष्टातील सुमारे ७.०० हेक्टर क्षेत्र वगळून विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.३ "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून आरक्षित्यात येत आहे.

प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील आ.क्र.३ व ४ खालील पूर्वेकडील सुमारे ०.४२ हेक्टर क्षेत्र वगळून विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.४ "दुकान केंद्र, भाजी मंडई व वाचनालय" म्हणून आरक्षित्यात येत आहे.

....३/-

-३-

२) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील आरक्षण क्र. ५, ६ व ८ खालील क्षेत्र वगळून करून नव्याने तयार झालेल्या २.२८ हेक्टर क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधान विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.८ "बगीचा" असे करण्यात येत आहे.

३) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.७ चे नामाभिधान "वाचनालय" ऐवजी "दवाखाना व प्रसूतिगृह" असे बदलण्यात येत आहे.

४) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील आ.क्र.१० व १० खालील क्षेत्र वगळून करून नव्याने तयार झालेल्या ०.२८ हेक्टर क्षेत्राच्या आरक्षणाचे नामाभिधान विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.१० "विस्थापितांसाठी पुनर्निर्माण" असे करण्यात येत आहे.

५) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.१३ चे नामाभिधान "माध्यमिक शाळा" ऐवजी "प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा" असे करण्यात येत आहे.

६) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र. १६, १७, १८, १९, २०, २१ ही आरक्षणे वगळण्यात येत असून त्याखालील जमिन रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने हे विकसित करीत असलेल्या क्षेत्राचा विकास करताना त्या क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या लोकवस्तीसाठी पुरेशा आरक्षणे प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, दुकान केंद्र, आणि बगीचा इत्यादी सुविधांचा अभिन्यास तयार करताना अभिन्यासात समाविष्ट करण्यात. या सुविधांचे योग्य स्थानमान अभिन्यास मंजूरीच्या वेळी ठरविण्यात येईल.

७) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.२२ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.२२ "बगीचा" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

८) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.२४ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.२४ "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

९) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.२६ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.२६ "बगीचा" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

....४/-

-४-

१०) प्रसिद्ध केलेल्या विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.२७ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.२७ "बगीचा" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

११) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "माध्यमिक शाळा व क्रीडांगण" याकरिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.२८ हे आरक्षण नामाभिधान बदलून विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.२८ "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

१२) आरक्षण क्र.३३ खालील पूर्वेकडील सुमारे ०.०४ हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे. आ.क्र.३३ "बगीचा" चे क्षेत्र सुमारे ०.६६ हेक्टर राहील.

१३) आरक्षण क्र.३४ खालील पूर्वेकडील सुमारे ०.०६ हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे. आ.क्र.३४ "वाचनालय" चे क्षेत्र सुमारे ०.२० हेक्टर राहील.

१४) आरक्षण क्र.३५ खालील पूर्वेकडील सुमारे ०.१ हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे. आ.क्र.३५ "प्राथमिक शाळा" चे क्षेत्र सुमारे ०.४१ हेक्टर राहील.

१५) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत अभिन्यासातील खुली जागा म्हणून दर्शविलेली स.क्र.१६५/२, १६६/२ मौजा म्हाडाराम मधील सुमारे ०.२६ हेक्टर जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे अस्तित्वातील प्राथमिक शाळा म्हणून दर्शविली आहे.

१६) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "दुकान केंद्र व भाजी मंडई" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.४२ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.४२ "दुकान केंद्र व भाजी मंडई" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

१७) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "माध्यमिक शाळा व क्रीडांगण" याकरिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आ.क्र.४३ हे आरक्षण नामाभिधान बदलून विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.४३ "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

....५/-

-५-

१८) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.४४ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.४४ "बगीचा" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

१९) आरक्षण क्र.४७ खालील पूर्वेकडील व दक्षिणेकडील सुमारे ०.२० हेक्टर क्षेत्राचा भाग विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे. आरक्षण क्र.४७ "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" चे क्षेत्र सुमारे ०.६९ हेक्टर राहील.

२०) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आ.क्र.४९ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.४९ "बगीचा" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

२१) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "वाहनतळ" याकरिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आ.क्र.५४ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.५४ "वाहनतळ" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

२२) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.५६ चे नामाभिधान "खुली जागा" ऐवजी "बालोद्यान" असे बदलण्यात येत आहे.

२३) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत टेलिफोन एक्सचेंज इमारत व कर्मचारी निवासस्थानाकरिता आरक्षित व शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेल्या आरक्षण क्र.५८ मधील दक्षिणेकडील सुमारे ०.६५ हेक्टर क्षेत्र नामाभिधान बदलून आ.क्र.५८ "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे. प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील आ.क्र.५८ मधील उत्तरेकडील सुमारे ०.८५ हेक्टर क्षेत्राकरिता आ.क्र.५८ "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व क्रीडांगण" म्हणून आरक्षित्यात येत आहे. विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.५८ "प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व क्रीडांगण" या आरक्षणाचे क्षेत्र सुमारे १.५० हेक्टर राहील.

आरक्षण क्र.५८ खालील दक्षिणेकडील सुमारे १.२० हेक्टर क्षेत्राची जमीन आरक्षणातून वगळून विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

२४) आरक्षण क्र.५९ "माध्यमिक शाळा व क्रीडांगण" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे रहिवास क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

.....६/-

-६-

२५) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.६० "प्राथमिक शाळा" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

२६) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ६५ "दवाखाना व प्रसूतिगृह" वगळण्यात येत आहे आणि त्या खालील जमीन रहिवासी विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

२७) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.६६ चे नामाभिधान "खुली जागा" ऐवजी "बालोद्यान" असे बदलण्यात येत आहे.

२८) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ७२ "माध्यमिक शाळा व प्राथमिक शाळा" वगळण्यात येत आहे आणि त्या खालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

२९) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्रमांक ७३ "क्रीडांगण" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

३०) आ.क्र.७५ खालील सुमारे ०.१५ हेक्टर क्षेत्राचा दक्षिणेकडील भाग विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षणातून वगळून रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे. आ.क्र.७५ "दुकान केंद्र आणि भाजी मंडई" या आरक्षणाचे क्षेत्र सुमारे ०.३५ हेक्टर राहील.

३१) आरक्षण ८८, १५ मीटर रुंद रस्ता आणि शेती विभाग म्हणून दर्शविलेली ग्रामीणक जमिनीची सुमारे १.६५ हेक्टर जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

आ.क्र.८८ "माध्यमिक शाळा व क्रीडांगण" या आरक्षणाचे क्षेत्र सुमारे १.१० हेक्टर राहील.

विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे दक्षिणेकडील रहिवासी क्षेत्र आणि आ.क्र.८८ यामधील जमिन १५ मी. रुंद रस्ता म्हणून दर्शविण्यात येत आहे.

३२) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे आ.क्र.९१ चे नामाभिधान "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणासाठी क्षेत्र" ऐवजी "विस्थापितांसाठी गृहनिर्माण" असे बदलण्यात येत आहे.

आ.क्र.९१ "विस्थापितांसाठी गृहनिर्माण" या आरक्षणासाठी भंडारा नगरपरिषद हे समुचित प्राधिकरण राहील.

...७/-

-७-

३३) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत "बगीचा" करिता आरक्षित आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेले आरक्षण क्र.९६ हे आरक्षण विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे नामाभिधान बदलून आ.क्र.९६ "बालोद्यान" म्हणून पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

३४) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.१०१ "बगीचा" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

३५) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.१०४ "वाचनालय" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

३६) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.१०६ "दुकान केंद्र" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

३७) विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे आरक्षण क्र.११० "बालोद्यान" वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

३८) आ.क्र.२८ पासून ३० मीटर रुंद रस्त्याला मिळणाऱ्या १५ मीटर रुंद [illegible] प्रस्तावानुसार पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

आरक्षण क्र.२८ आणि १५ मी. रुंद रस्त्यालगत चे औद्योगिक क्षेत्र यांचे प्रस्तावदेखील प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावानुसार पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

३९) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावानुसार सुमार रस्त्यापासून कालव्यालगत आ. क्र.१२६ मधील १५ मी. रुंद रस्त्यापर्यंत विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

+ पूर्व-पश्चिम १२ मी. रुंद रस्ता.

४०) प्रारूप विकास योजना शासनास सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला कारा क्र.११ म्हाडारामपासून स्मशानभूमीपर्यंत व स.क्र.१४५/४ पर्यंतचा ३० मी. रुंद उत्तर दक्षिण रस्ता प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावानुसार विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

प्रारूप विकास योजना शासनास सादर करताना कारा क्र. १४५/४ पासून कारा क्र.११ म्हाडारामपर्यंत नियोजन प्राधिकरणाने नव्याने प्रस्तावित केलेला ३० मीटर रुंद उत्तर दक्षिण रस्ता वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने शेती विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

....८

-८-

४१) प्रारूप विकास योजना शासनाला सादर करताना नियोजन प्राधिकरणाने वगळलेला शासकीयनगर जवळ सुमार रस्त्यापासून सीता मेंढा बाजारपर्यंत प्रस्तावित केलेला १२ मी. रुंद पूर्व-पश्चिम रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

४२) कारा क्र.१४५/२, १४५, १०४ मधून आ.क्र.१९ पासून रेल्वेमार्गालगतच्या १२ मी. रुंद रस्त्यापर्यंत नियोजन प्राधिकरणाने नव्याने प्रस्तावित केलेला १२ मी. रुंद पूर्व-पश्चिम रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे वगळण्यात येत आहे. आणि त्याखालील जमीन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

४३) कारा क्र.५०, ५१ ६७, ७७ ७८ म्हाडारामधून नियोजन प्राधिकरणाने नव्याने प्रस्तावित १५ मी. रुंद उत्तर-दक्षिण रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे वगळण्यात येत आहे आणि त्याखालील जमिन रहिवासी क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहे.

४४) कारा क्र.२५, २४, ५५, ५७, ५८ मधून जाणारा १२ मी. रुंद उत्तर-दक्षिण रस्ता आणि कारा क्र.५८, ६० मधून जाणारा १५ मी. रुंद पूर्व-पश्चिम रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावानुसार पुन:प्रस्थापित करण्यात येत आहे.

४५) बाबरा मेंढा व हुकरा मेंढा मधून मोघपूर रस्त्यापर्यंत नव्याने प्रस्तावित केलेला ३० मी. रुंद रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे वगळण्यात येत असून त्याखालील जमिन शेती विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

४६) ग्राम तलावाजवळ आ.क्र.५७ पासून पिंडकेपार मंदिरापर्यंत नव्याने प्रस्तावित केलेला १२ मी. रुंद उत्तर-दक्षिण रस्ता विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाने दर्शविल्याप्रमाणे रद्द करण्यात येत आहे. आणि त्याखालील जमिनी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेतील प्रस्तावानुसार त्या त्या वापरासाठी पुन:प्रस्थापित करण्यात येत आहेत.

४७) कारा क्र.५ मधील हुकरा मेंढ्याच्या नैऋत्येकडील शेती विभागातील जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविल्याप्रमाणे औद्योगिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

४८) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत औद्योगिक विभागात समाविष्ट असलेली आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी क्षेत्रात समाविष्ट केली कारा क्र.१५५ मधील जमीन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे औद्योगिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

....९

-९-

४९) प्रसिद्ध केलेल्या प्रारूप विकास योजनेत औद्योगिक विभागात समाविष्ट असलेली आणि शासनाला प्रारूप विकास योजना सादर करताना नियोजन प्राधिकरणाने रहिवासी क्षेत्रात समाविष्ट केली स.क्र.१२९ मधील जमिन विकास योजना नकाशावर गुलाबी रंगाच्या किनारीने दर्शविल्याप्रमाणे औद्योगिक विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

५०) आरक्षण क्रमांक ७६ "प्राथमिक शाळा व क्रीडांगण" या आरक्षणाचे समुचित प्राधिकरण "आदर्श महिला मंडळ" ऐवजी "भंडारा नगर परिषद" असे बदलण्यात येत आहे.

५१) विकास योजना नकाशावर दाट ठोकळ्यांचे क्षेत्र गुलाबी रंगाचे किनारीने दर्शविले आहे.

५२) विकास नियंत्रण नियमांमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे :-
(१) नियम क्रमांक २०.१ मध्ये जमिन वापर तालिकेत (ई) नंतर (फ) वाणिज्य वापर विभाग समाविष्ट करण्यात येत आहे.
(२) नियम क्रमांक २०.१(ई) विशेष आरक्षणे यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

नियम - २०.१(ई) विशेष आरक्षणे —

जमिन वापर आणि विकासाची रीत :

विकास योजनेत विनिर्दिष्ट वापरासाठी आरक्षित केलेल्या/निर्देशित केलेल्या/दर्शविलेल्या जमिनींचा वापर/विकास खालील पद्धतीने करावा-

विकास योजनेत आरक्षित दर्शविलेला/निर्दिष्ट केलेला जागेचा वापर/उपयोग.	व्यक्ति/विकास करणारे प्राधिकरण	जागेचा विहित विकास अनुज्ञेय करण्यासंबंधीच्या अटी.
शैक्षणिक वापर माध्यमिक शाळा	सार्वजनिक संस्था/न्याय संस्था/सार्वजनिक प्राधिकरण/जमिन मालक.	माध्यमिक शाळेसाठी दर्शविलेली/आरक्षित जागा सार्वजनिक प्राधिकरण, नोंदणीकृत सार्वजनिक न्याय संस्था व स्वत:चे उपयोगासाठी जागा मालक [illegible] किंवा अशी [illegible] जागा अन्य सार्वजनिक संस्थेस माध्यमिक शाळेच्या उपयोगासाठी जागा भाडेपट्ट्याने देऊ शकेल.

..१०.

-१०-

(३) परिशिष्ट 'बी' मध्ये खालील नविन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

बी-८ : वाणिज्य विभाग (सी)

बी-८.१ वाणिज्य विभागामध्ये इमारती किंवा जमिनीचा वापर फक्त बी-८.२ मध्ये दिलेल्या वापरांसाठी व प्रयोजनांसाठी खाली दिलेल्या अटींच्या अधिन राहून करण्यात यावा.

(अ) विक्रीसाठी ठेवलेला सर्व माल आतील मार्ग (पॅसेज) धरून इमारतीमध्ये ठेवण्यात यावा.

(ब) जेव्हा वाणिज्य विभागाची सीमा रस्त्यापर्यंत नसून आतल्या बाजूला असेल तेव्हा त्या रस्त्यालगत अनुज्ञेय नसलेल्या विक्रीसाठी अशा रस्त्यालगतच्या पुढच्या भागात परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

(क) आर-१ विभागातील अनुज्ञेय वापराचेच इतर वापरांना बाजूच्या किंवा मागच्या कुंपणावरून प्रवेश असेल तेव्हा अशा खुल्या बाजूची रुंदी ७ मीटर पेक्षा कमी नसावी.

बी-८.२ वापर तरतुदी

(१) आर-२ विभागात अनुज्ञेय असणारे कोणतेही वापर
(२) बेकरी, खाद्यपदार्थ तयार करणारे व विक्री करणारे कारखाने (सेवा उद्योगांच्या सूची प्रमाणे)
(३) वाहनांच्या सुट्या भागांची दुकाने, मोटार वाहनांचे व फेरनिर्मितीचे प्रदर्शन कक्ष.
(४) मुख्याधिकाऱ्यांच्या विशेष लेखी परवानगीने वरच्या मजल्यावर निवासी व तळेच्या वापर मौल तर ५० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र नसलेले, ९ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेले, ५ अश्व शक्तीपेक्षा अधिक शक्ती वापरीत नसलेले आणि कारणांनी उपद्रव करीत नसलेले दुरुस्ती गॅरेज.
(५) वापरलेला किंवा जुना माल किंवा वस्तु यांची विक्री (अडगळ, वैर किंवा अशा स्वरुपाचा माल धरून)
(६) क्लब हाऊस किंवा व्यवसाय म्हणून करण्यात येणारे इतर करमणुकीचे कार्यक्रम/उद्योग.

....११/-

-११-

(७) पर्यटन किंवा जत्रेची सामग्रीची साठवण.
(८) ५०० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र नसलेले बांधकाम किंवा बांधील खालील बांधकाम साहित्याची किरकोळ विक्री करणारी संस्था.
(९) गुरांचे दवाखाने, रुग्णालये आणि कुत्र्यांच्या कोंडवाडा.
(१०) मुख्याधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीने व खालील निर्बंधातील खालील प्रकारचे (वस्तु निर्माण प्रकारचे नसलेले) औद्योगिक उद्योग :-
(अ) ५० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र नसलेला फक्त तळमजल्यापुरता मर्यादित असा उद्योग.
(ब) ऊर्जा निर्माण करणाऱ्या यंत्रिक शक्तीस वीज मोटारीचे एकूण वीज शक्ती ५ अश्व शक्तीपेक्षा जास्त नसावी.
(क) नऊ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत असू नयेत.
(११) ९ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेले आणि २५ अश्वशक्तीच्या वीज मोटारी वापरात असलेले निर्जंतुकीकरण आणि दुग्ध प्रक्रिया केंद्र.
(१२) प्रत्येकी १२० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र नसलेल्या, १० अश्वशक्ती पेक्षा अधिक वीज मोटारी वापरात नसलेल्या मुद्रण, पुस्तक बांधणी, कोरीव काम व ठसे तयार करणाऱ्या संस्था.
(१३) पशुंसाठी धान्यकोठा.
(१४) १० अश्वशक्तीपेक्षा अधिक प्रेरकशक्तीची आवश्यकता नसलेले, एकूण १५ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेले दुरुस्तीची, धुलाईची दुकाने आणि विश्लेषणात्मक, प्रायोगिक किंवा चाचणी प्रयोग शाळा संस्था (त्यात धुलाई व रंगकामाच्या रसायनांच्या प्रज्वलन अंक १३८° फॅरनहाईट पेक्षा कमी असणारे, २० किलो तुकडा माराव्यापेक्षा जास्त वजन असणारे, वास, धूळ, धूर, वायु, ध्वनी, कंपने इत्यादींच्या उत्सर्जनामुळे अपायकारक क्रिया करणारे किंवा अन्यथा सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता धोकादायक संस्थांचा समावेश नाही).
(१५) कोणत्याही अनुज्ञेय वापराला आनुषंगिक असलेला उपसाधक वापर. यात प्रमुख वापरासाठी व्यापले गेलेल्या तळ क्षेत्राच्या ५० टक्के पर्यंतच्या साठवण जागा ही अंतर्भूत आहे.

...१२/-

-१२-

(१६) ९ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेल्या, व ५ अश्वशक्ती पेक्षा अधिक प्रेरक शक्ती वापरात नसलेल्या कागदी खोके तयार करणाऱ्या संस्था. यात कागद कापण्याचाही समावेश असेल.

(१७) ६ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेल्या ३ अश्वशक्ती पेक्षा अधिक प्रेरक शक्ती नसलेल्या गाद्या तयार करणाऱ्या व कापूस पिंजाई करणाऱ्या संस्था.

(१८) ९ पेक्षा अधिक व्यक्ती नोकरीत नसलेल्या आणि २ पेक्षा अधिक प्रेरकशक्ती नसलेल्या पत्र्याचे डबे, नळ्या इत्यादी सोल्डर करण्यासाठी वीज आवश्यक असलेल्या संस्था.

(१९) बर्फ दालने, मत्स्यालये.

(२०) आग किंवा स्फोटाचा कोणताही धोका नसलेला, किंवा अपायकारक स्वरुप नसलेल्या उद्योग, प्रायोगिक आणि चाचणी प्रयोग-शाळा. यात वाणिज्य मुक्तिक्षेत्राचे क्षेत्र ४ हेक्टर पेक्षा जास्त असले पाहिजे, मुक्तीक्षेत्राच्या कोणत्याही हद्दीपासून प्रयोगशाळा ३० मीटर अंतरावर असली पाहिजे. व आजूबाजूच्या रहिवासी इमारती प्रयोगशाळेपासून ३० मीटर अंतरावर असल्या पाहिजेत.

(२१) २५० चौ.मी. पेक्षा अधिक क्षेत्र नसलेले व ७५ अश्वशक्ती पेक्षा अधिक शक्ती वापर करीत नसलेले बर्फाचे कारखाने.

(२२) व्यावसायीक कार्यालये आणि विनिमय केंद्रे.

(२३) अग्नी प्रतिबंधक उपाययोजनेच्या अटींच्या अधीन २०० चौ.मी. पेक्षा जास्त साठवण क्षेत्र नसलेल्या ठोक विक्री करणाऱ्या संस्था.

....१३/-

-: १३ :-

२४. मुख्याधिकारी यांच्या विशेष लेखी परवानगीने व लगतच्या परिसरातील विकास लक्षात घेऊन व वरिष्ठ शक्ती वापर बंधन नसलेले व स्वतंत्र इमारतीत वाणिज्यात येणाऱ्या मुद्रण, पुस्तक बांधणी, कोरीव काम व ठसे तयार करणाऱ्या संस्था.

२५. प्रमुख सार्वजनिक उपयोगिता इमारती.

२६. मुद्रणालये, संस्था.

पुणे - १.
दिनांक: २९-५-१९९२.

[गुणवंत मदाने]
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.